विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे कार्यालयातील पोलीस अधिक्षक (मुख्यालय), महामार्ग पोलीस, मुबई यांना "कार्यालय प्रमुख" आणि "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषीत करणे.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

शासन निर्णं . क्रमांक एमआयएस १००६/प्र.क्र.३४८/पोल-८
मंत्रालय, मुं ई ४०० ०३२, दिनांक ३ ऑक्टोंबर, २००६

वाचा :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३६/ व का. (८३००)/ का.प्र./४९/२००६, दिनांक २४.५.२००६.

शासन निर्णय :- विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयासाठी गृह विभाग, शासन निर्णय क्र. आरए-०२९५/५२/भाग-३/पोल-८, दिनांक ११.९.१९९६ अन्वये महामार्ग पोलीस विभागासाठी "पोलीस अधिक्षक" हे पद निर्माण करण्यात आले असून त्यांचे मुख्यालय, मुंबई असे ठेवण्यात आले आहे. सदर कार्यालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक/वित्त विषयक बाबी हाताळण्याच्या दृष्टीने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उप विभाग- एक मधील अ.क्र. १, नियम क्र.२ नुसार प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पोलीस अधीक्षक, (मुख्यालय) महामार्ग पोलीस, मुंबई यांना "कार्यालय प्रमुख" आणि "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा. ग. गुंजाळ)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई,
विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुबई,
पोलीस अधिक्षक (मुख्यालय), महामार्ग पोलीस, मुंबई,
प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुं ई,
अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, (विनियम) मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
निवडसूची.